*किरकोळ अर्ज क्रं.१००२/२०२१.*

*सौ. लईका विकारअजीम खान*
*विरूध्द*
*पुणे महानगरपालिका*

*<u>निशाणी—०१ वरील आदेश</u>*

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी महाराष्ट्र जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये त्यांचे जन्म नोंदणीचा आदेश होणे कामी केलेला आहे.

२. **<u>सदर अर्जाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे</u> :—**

अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार त्यांचे नाव सौ. लईका विकारअजीम खान लग्नापुर्वीचे, लईका मोहम्मद अस्लम विकार रा. २ डी,/१००५, एच एम रॉयल, कोंढवा रोड, कोंढवा बुद्रुक, पुणे येथे दि. २८/०२/१९५७ रोजी ३२६, महात्मा फुले, गंजपेठ, पुणे येथे झाला असे म्हणणे आहे.

३. सदर अर्जदार यांच्या जन्माची नोंद एका वर्षाच्या आतमध्ये करणे आवश्यक होते. परंतु नजरचुकीने राहुन गेलेले आहे.

४ अर्जदार यांच्या जन्माची नोंद पुणे महानगरपालिकेच्या दप्तीरी अद्यापर्यंत झालेली नव्हती व नाही म्हणून, सदर जन्म दाखला रितसर मिळण्यासाठी जन्म मृत्यू नोंदणी महाराष्ट अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज केला आहे.

५. जाबदेणार यांना त्याचे म्हणणे सादर करणेकामी नोटीस पाठवण्यात आली. पुणे म.न.पा. यांनी अर्जदार यांच्या जन्माची नोंद आढळुन येत नसलेबाबतचे अनुउपलब्धता प्रमाणपत्र दिले असलेबाबत

म्हणणे दिले आहे.

**६.** अभिलेखावरील कागदपत्रावरून व अर्जातील कथनावरून खालील नमुद मुद्दे माझे विचाराधीन निघत असून त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| **अ. क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे का ? | होय. |
| २ | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुददा क्रं. १ व २ बाबत</u> :—**

७. अर्जाच्या पुष्ठयर्थ त्यांचे प्रतिज्ञापत्र नि.०४ वर दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्ठयर्थ अभिलेखावर अर्जदाराने अर्जदाराची नोंद नसल्याचे पुणे म.न.पा.चे पत्र नि.क्र.०७, अर्जदाराचे आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, मतदानकार्ड यांच्या व्हेरीफाईट प्रती दाखल केलेली आहे.

**८.** अर्जदाराचा अर्ज, पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.०६, तसेच अर्जदाराचे अनुउपलब्धता प्रमाणपत्र नि.०७ याची मुळ प्रत दाखल केली आहे, यावरून अर्जदार यांच्या नावाची नोंद नसल्याचे स्पष्ट होते. अर्जदार यांना त्यांच्या जन्मप्रमाणपत्र सरकारी प्रयोजनाकामी आवश्यक असल्यामुळे मिळणे आवश्यक आहे, त्यामुळे सदर अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजूर होणेस पात्र आहे. सबब वरील सर्व कारणांमुळे मी मुददा

क्रं. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित असुन मुदद्ा क्रं.२ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी—०१ मंजूर करण्यात आला.

२. निबंधक, जन्म—मृत्यु विभाग, मा. निबंधक, पुणे म.न.पा., पुणे यांनी अर्जदार यांचा **सौ. लईका विकारअजीम खान लग्नापुर्वीचे, लईका मोहम्मद अस्लम विकार रा. २ डी,/१००५, एच एम रॉयल, कोंढवा रोड, कोंढवा बुद्रुक, पुणे येथे दि.२८/०२/१९५७ रोजी ३२६, महात्मा फुले, गंजपेठ, पुणे** जन्माची नोंद योग्य ते शुल्क आकारून जन्म—मृत्यु नोंदणी रजिस्टरमध्ये घ्यावी असा आदेश देण्यात येत आहे.

३. त्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्याला पत्र पाठविण्यात यावे.

Sd/-xx
(श्री. मो.अ.शेख)
दि.०८/०३/२०२१.
१३ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे.

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Hon'ble Shr. M.A.Shaikh<br>13th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Pune. |
| Name of the Steno | : | Shri. D.B.Gaikwad, (L.G.) |
| Order Date | : | 08/03/2021. |
| Order signed by P. O. on | : | 08/03/2021 |
| Order uploaded on | : | 09/03/2021 |